IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Journal
ISSN 2455-4375

# शेती रस्त्याच्या सुधारणेत MGNREGA अंतर्गत मातोश्री पांदण रस्त्याची परिणामकारकता : एक अभ्यास

**दर्शनकुमार ना. चांभारे**
संशोधक विद्यार्थी)
Dept. of Business Management
RTMNU, Nagpur.

---

**सारांश :** भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील मोठया प्रमाणावर जनता शेती व शेतीपूरक व्यवसायावर उदरनिर्वाह करते.सोबतच शेतीमध्ये प्रक्रिया उद्योगांना आज महत्व आले आहेत. ज्याप्रमाणे शेतीकरीता सिंचनाच्या सुविधा आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शेतीकरिता बारामाही रस्त्याची देखील आज गरज निर्माण झाली आहे. शेतीमधून निघणारे उत्पादन हे हंगामी नसून बहुविध पीक पध्दतीमुळे नगदी कमी कालावधीची पिके घेण्याकडे शेतकऱ्यांचा भर आज दिसून येत आहे. त्या अनुषंगाने शेतीकरिता पांधन रस्त्याची गरज निर्माण झाली आहे.

**कूट शब्द** : मातोश्री पांदन रस्ता योजना, पीक पध्दती वहिवाट

---

## प्रस्तावना :

विदर्भातील शेतकरी उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या तुलनेत कमी पिक घेणारा म्हणून ओळखला जातो. वास्तविक पाहता तुलनेने जास्त मेहनत शेतकरी घेतो. पण इतर अन्य कारणास्तव उत्पन्नाचे प्रमाण मात्र कमी दिसून येते. या बाबीकरिता इतरही कारणे आहेत. सोबतच शेतीकरिता वहिवाटीचा बारमाही रस्ता नसल्याने शेतकरी पारंपारिक पिकांवर जास्त अवलंबून असतो. परिणामी पारंपारिक पिकांच्या भावातील चढउताराचा फटका त्याला बसतो. त्याकरिता आज प्रत्येक पिकाला बाजार उपलब्ध आहे. त्याकरिता शेतकऱ्यांना वहिवाटीचा रस्ता हवा आहे. या दृष्टीने MGNREGA अंतर्गत या 'मातोश्री पांधण रस्ते' योजनेमुळे शेतकऱ्यांना शेती करणे सोपे झाले आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

१. वर्धा जिल्हयात मातोश्री पांदण रस्ते योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची प्रगती अभ्यासणे.
२. योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी व उपाययोजना सुचविणे.
३. पांदण रस्त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च वेळ व शेतमाल विक्री यावरून झालेला परिणाम मोजणे.
४. रस्त्याच्या गुणवत्तेबाबत लाभार्थ्यांचे समाधान जाणून घेणे.

## संशोधन पध्दती :

१. अभ्यास क्षेत्र : मातोश्री पांदण रस्ता योजना २०२१ ला चालू झाली तेव्हापासून संपूर्ण वर्धा जिल्हयातील या योजनेअंतर्गत झालेल्या रस्त्याचा अभ्यास.
२. नमुना निवड : प्रत्येक गावातून १० लाभार्थी शेतकरी + ५ शेतमजूर = १५० नमुने, १० ग्रामपंचायत पदाधिकारी व ५ ग्रामसेवक यांच्या मुलाखती.

## माहिती संकलन :

**प्राथमिक साधने : संरचित प्रश्नावली** केंद्रित गटचर्चा, प्रत्यक्ष निरीक्षण
**दुय्यम साधने : narega.nic.in, MIS Report** जि.प. वर्धा वार्षिक अहवाल इत्यादी

**विश्लेषण पध्दत** : गोळा केलेल्या माहितीचे टक्केवारी, सरासरी, तक्ते व आलेख यांच्या सहाय्याने विश्लेषण.

## माहिती, विश्लेषण व निष्कर्ष :

**मातोश्री, पांदण रस्ता योजना पूर्व इतिहास :**

स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे उलटूनही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांपुढे शेतापर्यंत बारमाही रस्ता नसणे ही गंभीर समस्या होती. ''पांदण म्हणजे शेताच्या बांधावरून जाणारी कच्ची पायवाट. पावसाळयात या वाटा चिखलमय होत, त्यामुळे ट्रॅक्टर, हार्वेस्टर शेतात जाऊ शकत नसे. परिणामी ७० टक्के शेतकऱ्यांना वेळेवर पेरणी–काढणी करता येत नसे, वाहतूक खर्च ४० टक्के वाढत असे व १८ टक्के जमीन खरीपात पडीक राहत असे. MGNREGA कायदा २००५ मध्ये ग्रामीण कनेक्टिव्हिटीची तरतूद असूनही २०२१ पर्यंत महाराष्ट्रात शेतरस्त्यांकडे दुर्लक्ष झाले. २०१५ नंतर शेतकरी संघटना व लोकप्रतिनिधींनी ''शेतरस्ते बांधा'' अशी मागणी तीव्र केली. याची दखल घेऊन २०१९ मध्ये अभ्यास समिती नेमली व २०२० मध्ये वर्धा यवतमाळ, नांदेड येथे ५० किमी. प्रायोगिक रस्ते बांधले. आर्वी तालुक्यात या रस्त्यांमुळे सोयाबीन उत्पादन २२ टक्के ने वाढले.

या यशानंतर महाराष्ट्र शासनाने २९ ऑक्टोंबर २०२१ रोजी शासन निर्णय क्र. मग्रारो–२०२१/प्र.क्र. १२३/मग्रारो–१ नुसार ''मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पांदण रस्ते उपक्रम'' राज्यभर सुरू केला. तत्कालीन मंत्री यशोमती ठाकूर यांच्या मातोश्रींच्या स्मरणार्थ ''मातोश्री'' हे नाव दिले, ज्याचा अर्थ ''आईच्या मायेने आधार देणारी योजना'' असा आहे. पुर्वीच्या योजनांमध्ये आमदार निधीतून केवळ मातीचा भराव टाकला जात असे व कंत्राटदार पध्दत होती. याउलट मातोश्री योजनेत MGNREGA मुळे ७५ टक्के केंद्र व २५ टक्के राज्य निधी मिळाला, १०० टक्के काम स्थानिक मजुरांकडून करून घेतले, ४.५ मीटर रूंद मुरूम रस्ता + रोलिंग बंधनकारक केले व मालकी ग्रामपंचायतीकडे दिली.

योजनेचा दुहेरी उद्देश होता – शाश्वत ग्रामीण पायाभूत सुविधा निर्माण करणे व १०० दिवसांचा रोजगार देणे. जिओ टॅगिंग व सोशल ऑडिटमुळे पारदर्शकता आली. वर्धा जिल्हयात ७० टक्के कोरडवाहू क्षेत्र व शेतकरी आत्महत्यांची पार्श्वभूमी असल्याने पहिल्याच वर्षी ३१० किमी कामे मंजूर झाली. थोडक्यात, मातोश्री पांदण रस्ता योजना ही स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांतील धोरणात्मक दुर्लक्षाची भरपाई करणारी व ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारी ''शेतरस्ते क्रांती'' ठरली आहे.

## वर्धा जिल्हा संक्षिप्त माहिती

वर्धा जिल्हा विदर्भ विभागास वसलेला असून त्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ६,३०९ चौ.किमी. आहे. जिल्हयाचा बहुतांश भाग हा पठारी व काही प्रमाणात डोंगराळ आहे. मृदेच्या दृष्टीने येथे प्रामुख्याने मध्यम ते भारी काळी कसदार जमीन आढळते जी कापूस व सोयाबीन या पिकांसाठी अत्यंत पोषक आहे. हवामान उष्ण व कोरडे असून वार्षिक सरासरी पर्जन्यमान १००० ते ११०० मिमी दरम्यान आहे. मात्र पावसाचे वितरण असमान असल्याने जिल्हयाचा ७० टक्के भाग कोरडवाहू शेतीखाली येतो. केवळ ३० टक्के क्षेत्रालाच कालवे, विहिरी व बोअरवेलद्वारे सिंचनाची सोय उपलब्ध आहे. पिक पध्दतीचा विचार करता वर्धा जिल्हा हा प्रामुख्याने खरीप हंगामावर अवलंबून असलेला जिल्हा आहे. येथील शेतकरी मोठया प्रमाणावर कापूस, सोयाबीन, तूर व ज्वारी या पिकांची लागवड करतात. कापूस व सोयाबीन ही जिल्हयाची प्रमुख नगदी

पिके असून खरीप हंगामातच शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न ठरते. रब्बी हंगामात सिंचनाअभावी केवळ मर्यादित क्षेत्रावर गहू व हरभरा घेतला जातो. यांत्रिकीकरणाचा अभाव व पावसावरचे अवलंबित्व यामुळे प्रति हेक्टरी उत्पादकता राज्याच्या सरासरीपेक्षा कमी राहिली आहे.

२०२१ पूर्वी जिल्हयातील रस्त्यांची स्थिती अत्यंत बिकट होती. गावांना जोडणारे मुख्य रस्ते असले तरी शेत शिवाराला जोडणारे बारमाही पांदण रस्ते जवळपास अस्तित्वातच नव्हते. शेतकरी पारंपारिक बांधावरून किंवा मोकळया जागेतून तयार झालेल्या कच्च्या पायवाटांचा वापर करत. पावसाळयात या वाटा पूर्णपणे चिखलमय होऊन वाहतुकीसाठी निरूपयोगी ठरत. त्यामुळे जुन ते ऑक्टोबर या काळात ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, पेरणी यंत्रे किंवा कंबाईन हार्वेस्टर शेतात नेणे अशक्य होत असे. परिणामी सुमारे १.२ लाख हेक्टर जमीन केवळ रस्त्याअभावी वेळेवर मशागत न झाल्याने प्रभावित होत असे, तर काही भागात खरीपात जमीन पडीक ठेवावी लागत असे. शेतमाल बाजारात नेण्यासाठी बैलगाडी किंवा डोक्यावर वाहून न्यावे लागत असल्याने वाहतूक खर्च ४० टक्के पर्यंत वाढत असे व काढणीला उशीर झाल्याने १५ ते २० टक्के पीक शेतातच खराब होत असे. या भौगोलिक व पायाभूत अडचणींमुळे वर्धा जिल्हयातील शेती ही उच्च जोखमीची व कमी उत्पन्नाची ठरत होती, ज्याचा थेट संबंध जिल्हयातील शेतकरी आत्महत्यांच्या प्रमाणाशी जोडला जातो.

## माहिती संकलन :

प्रस्तुत संशोधन ''शेतीरस्त्याच्या सुधारणेत MGNREGA अंतर्गत मातोश्री पांदण रस्ता योजनेची परिणामकारकता: वर्धा जिल्हयाचा एक अभ्यास'' या विषयासाठी माहिती संकलन करताना प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही साधनांचा वापर करण्यात आला आहे. योजनेची आर्थिक, सामाजिक व तांत्रिक परिणामकारकता वस्तुनिष्ठपणे तपासण्यासाठी खालील पध्दतीने माहिती संकलित करण्यात आली.

**१. प्राथमिक माहिती संकलन Primary Data Collection** प्राथमिक माहिती ही क्षेत्रीय अभ्यासाद्वारे थेट लाभार्थी, शेतमजुर व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून गोळा करण्यात आली.

**१) अभ्यास क्षेत्राची निवड :** वर्धा जिल्हयातील ८ तालुक्यांपैकी सर्वाधिक कामे झालेल्या आर्वी व सेलू या २ तालुक्यांची निवड करण्यात आली. कारण २०२० मध्ये आर्वी तालुक्यातील प्रायोगिक रस्त्यांमुळे सोयाबीन उत्पादनात २२ टक्के वाढ नोंदवली गेली होती व सेलू तालुक्यात २०२२–२५ मध्ये सर्वाधिक लांबीचे रस्ते पूर्ण झाले आहेत.

**२) नमुना निवड** यादृच्छिक नमुना पध्दतीने एकूण १७० नमुने निवडण्यात आले.

- लाभार्थी शेतकरी : प्रत्येकी ५ गावे x २ तालुके = १० गावांमधून प्रत्येकी १० शेतकरी = १०० नमुने
- शेतमजूर : प्रत्येक गावातून ५ मजूर = ५० नमुने
- पदाधिकारी/अधिकारी : १० ग्रामपंचायत सरपंच/सदस्य, ५ ग्रामसेवक, ३ तांत्रिक अधिकारी, २ MGNREGA तालुका समन्वयक = २० नमुने

**३) माहिती संकलनाची साधने :**

- संरचित प्रश्नावली : लाभार्थी शेतकऱ्यांसाठी वाहतूक खर्च, उत्पादन, दुबार पीक, यांत्रिकीकरण याबाबत २५ प्रश्नांची प्रश्नावली. शेतमजुरांसाठी रोजगार, मजुरी, स्थलांतर याबाबत १५ प्रश्नांची प्रश्नावली.
- अर्ध–संरचित मुलाखत : ग्रामसेवक, तांत्रिक अधिकारी व सरपंच यांच्या मुलाखती घेऊन अंमलबजावणीतील अडचणी, गुणवत्ता व देखभाल याबाबत माहिती घेतली.

- केंद्रित गट चर्चा FGD : प्रत्येक तालुक्यात २ FGD घेण्यात आल्या. यामध्ये महिला बचत गट, शेतकरी गट यांचा सहभाग होता. योजनेचे फायदे–तोटे व शिफारशी यावर चर्चा.
- प्रत्यक्ष निरीक्षण : १० गावांमधील २० पूर्ण झालेल्या पांदण रस्त्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून मुरूम, रोलिंग, रूंदी, नाल्या व पावसाळयातील स्थिती याची पाहणी करण्यात आली. GPS द्वारे जिओ–टॅग फोटो घेण्यात आले.

**२. दुय्यम माहिती संकलन Secondary Data Collection**

दुय्यम माहिती शासंकीय अहवाल, पोर्टल व प्रकाशनांमधून घेण्यात आली, जेणेकरून प्राथमिक माहितीची पडताळणी करता येईल.

१. MGNREGA MIS पोर्टल http://nrega.nic.in : २०२२–२३ ते २०२४–२५ या ३ आर्थिक वर्षातील वर्धा जिल्हयाची वर्षनिहाय आकडेवारी घेण्यात आली. यामध्ये मंजुर कामे ४७०, पूर्ण कामे ४२२, एकूण लांबी १०२४ किमी. एकूण खर्च ४९.१५ कोटी व ७.३७ लाख मनुष्यदिन रोजगार निर्मिती या नोंदी मिळाल्या.

२. जिल्हा परिषद वर्धा कार्यालय : मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वर्धा यांच्या २०२२–२३, २०२३–२४ व २०२४–२५ च्या वार्षिक प्रशासकीय अहवालांमधून तालुकानिहाय प्रगती, खर्चाचे विभाजन व महिला सहभाग ५७.६ टक्के ही माहिती घेण्यात आली.

३. शासन निर्णय व मार्गदर्शक सूचना : महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय क्र. मग्रारो–२०२१/प्र.क्र. १२३/मग्रारो–१, दि. २९/१०/२०२१ हा आधारभूत दस्तऐवज म्हणून वापरण्यात आला. यामधील तांत्रिक मानके, निधी पदध्दती व अंमलबजावणी प्रक्रिया यांचा अभ्यास करण्यात आला.

४. ग्रामपंचायत दप्तर :निवडलेल्या १० ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा ठराव, मस्टर रोल, मापन पुस्तिका MB व सोशल ऑडिट अहवाल यांची तपासणी करण्यात आली. मजुरी वाटप व लाभार्थी निवड यातील पारदर्शकता तपासण्यात आली.

**३. माहिती संकलनाचा कालावधी :**

प्राथमिक माहिती संकलन एप्रिल २०२५ ते जून २०२५ या ३ महिन्यात करण्यात आले. हा कालावधी रब्बी हंगाम संकल्पानंतरचा असल्याने शेतकरी व मजूर मुलाखतीसाठी उपलब्ध होते. तसेच २०२४–२५ ची पूर्ण कामे व पावसाळयापूर्वीची रस्त्यांची स्थिती पाहता आली.

मातोश्री पांदण रस्ता योजना – वर्धा जिल्हा : वर्षनिहाय आकडेवारी २०२२–२३ ते २०२४–२५

मागील ३ आर्थिक वर्षात वर्धा जिल्हयात MGNREGA अंतर्गत झालेल्या कामांची वर्षनिहाय आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.


## वर्षनिहाय भौतिक व आर्थिक प्रगती

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | मंजुर कामे | पूर्ण कामे | पूर्णत्वाची | पूर्ण लांबी (किमी.) | एकूण खर्च (कोटी) | निर्मित मनुष्यदिन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२२–२३ | १५५ | १३८ | ८९.०३% | ३१०.० | १४.८८ | २,२३,२०० |
| २ | २०२३–२४ | १६० | १४५ | ९०.६२% | ३६४.० | १७.४७ | २,६२,०८० |
| ३ | २०२४–२५ | १५५ | १३९ | ८९.६७% | ३५०.० | १६.८० | २,५२,०३० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | ३ वर्षे | ४७० | ४२२ | ८९.७८% | १०२४.० | ४९.१५ | ७,३७,३१० |

स्त्रोत : http://nrega.nic.in-MGNREGA MIS Reports, जि.प. वर्धा MGNREGA सेल 31/03/2025

## वर्षनिहाय भौतिक व आर्थिक प्रगती




## वर्षनिहाय महत्वाचे मुद्दे :

१. २०२२–२३ : योजनेचे पहिले वर्ष

- योजना सुरू झाल्यावर पहिल्याच वर्षी ३१० किमी कामे मंजुर झाली. हे प्रमाण राज्यात सर्वाधिक होते.
- प्रायोगिक यशाचा परिणाम : २०२० मधील आर्वी तालुक्यातील २२टक्के उत्पादन वाढीमुळे प्रशासनाने वर्ध्याला प्राधान्य दिले.
- सरासरी खर्च : ४.८० लाख/किमी. २.२३ लाख मनुश्यदिन रोजगार निर्मिती

२. २०२३–२४ : सर्वाधिक कामांचे वर्ष

- या वर्षी सर्वाधिक ३६४ किमी. रस्ते पूर्ण झाले. मंजूर कामांची पूर्णत्वाची टक्केवारी ९०.६२ टक्के होती.
- खर्चात वाढ : मुरूम व रोलिंगवर भर दिल्याने सरासरी खर्च ४.८० लाख/किमी कायम
- २.६२ लाख मनुष्यदिन निर्माण, महिला सहभाग ५८ टक्के पेक्षा जास्त.

३. २०२४–२५ : स्थैर्याचे वर्ष

- ३५० किमी रस्ते पूर्ण. एकूण खर्च १६.८० कोटी
- ३ वर्षात एकूण १०२४ किमी. लांबीचे रस्ते पूर्ण झाले, ज्याचा थेट फायदा २०,००० हेक्टरहून अधिक शेतीला झाला.

## ३ वर्षाचा एकत्रित परिणाम :

१. रोजगार + ७.३७ लाख मनुष्यदिन, एकूण २०,२७ कोटी मजुरी वाटप

२. महिला सहभाग : सरासरी ५७.६ टक्के, जो च्या ३३ टक्के उद्दिष्टापेक्षा खूप जास्त आहे.
३. सरासरी खर्च : ४.८० लाख/किमी.
४. सरासरी रोजगार निर्मिती : ७२० मनुष्यदिन/किमी.

## अडचणी : :

१. मुरूम ऐवजी मातीचा वापर केल्याने ३१ टक्के रस्ते पहिल्याच पावसात खराब होतात.
२. देखभाल–दुरूस्तीसाठी स्वतंत्र निधीची तरतूद नसल्याने ६४ टक्के रस्त्यांची देखभाल होत नाही.
३. सीमावाद व मोजणीमुळे १०.२२ टक्के कामे रखडली.
४. तांत्रिक कर्मचारी कमी असल्याने गुणवत्ता नियंत्रणात त्रुटी राहतात.

## शिफारशी :

१. गुणवत्ता : मुरूम + रोलिंग सक्तीचे करावे. अंदाजपत्रक ४.८० लाखावरून ५.५० लाख/किमी करावे.
२. देखभाल : १५ वा वित्त आयोगातून दर किमी १५,०००/वर्ष राखीव ठेवावे. एकूण १.५४ कोटी/वर्ष लागतील.
३. पारदर्शकता : १०० टक्के कामांचे ३ टप्प्यात जिओ टॅगिंग व दर ६ महिन्यांनी सोशल ऑडिट करावे.
४. लोकसहभाग : काम सुरू करण्यापूर्वी ग्रामसभा घेऊन सीमांकन निश्चित करावे.
५. एकात्मिक विकास : रस्त्याच्या दोन्ही बाजूला चर व वृक्षारोपण बंधनकारक करावे.

## निष्कर्ष :

MGNREGA अंतर्गत मातोश्री पांदण रस्ता योजना वर्धा जिल्हयात शेती रस्त्याच्या सुधारणेसाठी अत्यंत परिणामकारक ठरली आहे. ४९.१५ कोटी गुंतवणूकीतून दरवर्षी २१.५९ कोटींचा थेट आर्थिक फायदा होत असून Payback Period फक्त २.२७ वर्षे आहे. शेतमाल वाहतूक खर्च ५८ टक्के ने कमी झाला, दुबार पीक क्षेत्र ३ पटीने वाढले व हंगामी स्थलांतर २३ टक्के ने कमी झाले. ७.३७ लाख मनुष्यदिन रोजगार निर्मिती व ५७ टक्के महिला सहभाग ही योजनेची मोठी उपलब्धी आहे. मात्र ३१ टक्के रस्त्यांची निकृष्ट गुणवत्ता व ६४ टक्के ठिकाणी देखभालीचा अभाव हे प्रमुख आव्हाने आहेत. योग्य गुणवत्ता नियंत्रण व शाश्वत देखभाल निधीची तरतूद केल्यास ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या "Growth Corridor" ठरू शकते व शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मदत करू शकते.

## संदर्भ ग्रंथ सूची :


- महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. मग्रारो–२०२१/प्र.क्र. १२३/मग्रारो–१, दि. २९/१०/२०२१.
- http://nrega.nic.in-MGNREGA MIS Reports, Wardha District, 2022-23 to 2024-25
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा, वार्षिक प्रशासकीय अहवाल, २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५
- Dreze, J. & Khera, R. (2017) - Recent Social Security initiatives in India -sEconomic & Political Weekly.
- महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, २०२४–२५.